# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी–४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (कुलसचिव कार्यालय)


एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५

फोन/फॅक्स नंबर ०७१३२–२२३१०४ E-Mail : gug.registrar@gmail.com


जा.क्र./गोंवीग/कुसका/10298/२०१८ दिनांक ०५/१२/२०१८

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नीत महाविद्यालय,
गोंडवाना विद्यापीठ,
गडचिरोली.

**विषय :– युथ एम्पॉवरमेंट समीट दि.४ जानेवारी ते ६ जानेवारी, २०१९ बाबत.**

**संदर्भ** :– प्रा. अनिल म. सोले, आमदार, नागपूर (पदवीधर मतदार संघ) यांचे पत्र क्रमांक अ.वि.म.स.२/१९ दिनांक ०२/१२/२०१८

**महोदय,**

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, पं. वसंतराव देशपांडे सभागृह, सिव्हिल लाईन्स, नागपूर येथे तीन दिवसीय युथ एम्पॉवरमेंट समिट चे आयोजन दिनांक ४ जानेवारी ते ६ जानेवारी, २०१९ या कालावधीत करण्यात आलेले आहे.

करीता आपणास विनंती करण्यात येते की, आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना या बाबत अवगत करून देण्यात यावे, ही विनंती.

(डॉ. ईश्वर मोहुर्ले)
कुलसचिव (प्रभारी)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र विधान परिषद

# प्रा. अनिल म. सोले

आमदार, नागपूर (पदवीधर मतदार संघ)
सचिव - भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश

6263 3/12/18

जा. क्र. अ वि.म.स. 2/13

दिनांक: 2/12/2018

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
कुलगुरूंचे कार्यालय
कक्ष क्र. 1150 दि. 03/12/18
आवक क्र. 3049 दि. 03/12/18

प्रति,
मा. कुलगुरू
गोंडवाणा विद्यापीठ,
गडचिरोली.

विषयः– युथ एम्पॉवरमेंट समीट दि. 4 जानेवारी ते 6 जानेवारी 2019

महोदय,

मागील चार वर्षापासून नागपूरमध्ये फॉर्च्यून फाऊंडेशन या संस्थेच्या माध्यमातून जिल्हाधिकारी, इसीपीए, नागपूर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने "युथ एम्पॉवरमेंट समीट" चे आयोजन करण्यात येते. याही वर्षी दि. 4 जानेवारी ते 6 जानेवारी 2019 दरम्यान "युथ एम्पॉवरमेंट समीट" स्थानिक पं. वसंतराव देशपांडे सभागृह, सिव्हिल लाईन्स, नागपूर येथे आयोजित करण्यात येत आहे. सतत तीन दिवस चालणाऱ्या या "समिट" मध्ये उद्बोधक विचारांची व्याख्याने, मुलाखती, परिसंवाद, स्लाईड शो, बँक्स, विविध वित्तीय संस्था व उद्यमशीलतेला पोषक ठरतील असे मार्गदर्शन करणारे सरकारी योजनांचे व स्वयंसेवी संस्थांचे स्टॉल्स असे भव्य आकर्षक स्वरूप असणार आहे.

दरवर्षी जवळपास 35 हजार युवक – युवतींना सहभाग या आयोजनामध्ये होतो. त्यामाध्यमातून रोजगार व स्वयंरोजगार यादृष्टीने मार्गदर्शक अशा अनेक कौशल्यपूर्ण बाबींची माहिती युवकांपर्यंत पोहचते. यापूर्वी मुद्रा बँक, स्टार्ट – अप इंडिया स्टॅण्ड, मेट्रो व मिहानमधिल रोजगारांच्या संधी यावर विविध वक्त्यांचे मार्गदर्शन होणार आहे. सर्व महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी या आयोजनाचा लाभ घेवून स्वतःच्या उज्वल भवितव्याची दिशा ठरविण्यासाठी हे आयोजन निश्चितपणे उपयोगी होईल.

माझी आपल्याला विनंती आहे की आपण या आयोजनाला सहकार्य करावे तसेच विद्यापीठ मधिल अभ्यासक्रम याबाबत माहिती देणारा स्टॉल प्रदर्शनी मध्ये लावावा व सर्व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना उपरोक्त तिन्ही दिवस समिटमध्ये सहभागी होऊन विविध वक्त्यांचे मार्गदर्शन व विविध स्टॉल्सला भेटी देण्याकरिता कृपया आपण आपल्या विद्यापीठ अंतर्गत येणाऱ्या सर्व महाविद्यालय यांचे मा. प्राचार्य महोदय यांना सुचना दयावी, हि विनंती.

धन्यवाद!

आपला स्नेहांकित,

आमदार प्रा. अनिल सोले
अध्यक्ष, फॉर्च्यून फाऊंडेशन

Registrar
Circulate & place on website
03/12

ऑफिस : प्लॉट नं.४, बुटी ले-आऊट, नागपूर - ४४००२२
ईमेल : amsole@rediffmail.com, मो.: ०९८२२५७८९५३ / ०९९२३५९६००३, फॅक्स नं.: ०७१२-२२४५६५१